**महाराष्ट्र शासन**

**इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई**

**कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - 440 022**

**दुरध्वनी क्रं.** 0712-2959381 CIN: U85300PN2019NPL187405 **ई मेल** mahajyotingp@gmail.com

**जा.क्र.** महाज्योती, नागपूर/आस्था/परिपत्रक /2023/2547 **दिनांक** :-23/11/2023

# परिपत्रक

सर्व विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की, नुकतीच महाज्योती मार्फत महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) परीक्षा पूर्व प्रशिक्षण -2023, महाराष्ट्र लोकसेवा आयोग संयुक्त गट ब व क परीक्षा पूर्व प्रशिक्षण-2023 आणि संघ लोकसेवा आयोग (UPSC) परीक्षा पूर्व प्रशिक्षण -2023 या योजनांकरीता पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांची प्रवर्गनिहाय यादी लवकरच महाज्योतीच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात येईल.

या प्रशिक्षणाकरीता दिव्यांग आणि अनाथ यांच्या करीता शासन निर्णयाप्रमाणे जागा राखीव ठेवण्यात आलेल्या आहे. त्यामुळे काही विद्यार्थ्यांनी अर्ज करतेवळी दिव्यांग असून त्यांनी दिव्यांग नमूद करण्याचे राहिलेले आहे किंवा काही जणांनी ते दिव्यांग नसताना देखील चुकून ते दिव्यांग असल्याचे नमूद केलेले आहे. तसेच अनाथ विद्यार्थ्यांच्या बाबतीमध्ये ते 'संस्थात्मक' किंवा 'संस्थाबाह्य' आहे याबाबतची नोंदणी देखील त्यांना करावयाची आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची निवड करताना कोणत्याही प्रकारची अडचण होऊ नये याकरीता विद्यार्थ्यांनी खालील प्रमाणे माहिती भरुन द्यावी:-

- विद्यार्थी, जर दिव्यांग असतील तर सदर्हु विद्यार्थ्याला दिव्यांग म्हणून नोंद करुन दिव्यांग असल्याचे प्रमाणपत्र अपलोड करावयाचे आहे.
- तसेच विद्यार्थी जर अनाथ असेल तर सदर्हु विद्यार्थी हा 'संस्थात्मक' अनाथ आहे की, 'संस्थाबाह्य' याबाबतची नोंद करुन प्रमाणपत्र अपलोड करावयाचे आहे.

संबंधित विद्यार्थ्यांनी दिलेल्या लिंकचा वापर करुन उपरोक्त नुसार लागू असलेली परीपूर्ण माहिती भरावी म्हणजे संबंधित विद्यार्थी देय असलेल्या लाभापासून वंचित राहणार नाहीत. याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

**सुचना**:-

1. रजिस्टर मोबाईल नंबर Enter करावा.
2. मोबाईल नंबर वर आलेला OTP Submit करावा.
3. दिव्यांग/अनाथ आहे किंवा नाही Select करावे. (अनाथ असल्यास संस्थात्मक/संस्थाबाह्य)
4. दिव्यांग/अनाथ असल्यास, प्रमाणपत्र सोबत जोडावे.

(स्वा.)
(राजेश खवले)
व्यवस्थापकीय संचालक
महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर.